जनसंपर्क कक्ष
12 AUG 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व्हावी : डॉ. शिर्के

**कोल्हापूर, ता. ११ :** सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत परिघावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणासाठी अंमलबजावणी प्रभावी होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये नवीन बांधलेल्या पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम अध्यक्षस्थानी होत्या.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, की नवीन शैक्षणिक धोरण हे शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांना स्वयंविकासाचे अवकाश खुले करून देणारे आहे. या शैक्षणिक धोरणातील अॅकॅडमिक बँक क्रेडिट सिस्टिम विद्यार्थ्यांच्या विकासाला गती देणारी आहे.



**कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमधील (कै.) पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम व सचिव डॉ. विश्वास मगदूम.**

सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम म्हणाले, की सध्याच्या सामाजिक घटनांचा विचार विवेक जागा ठेवून करावा व त्यांना सामोरे जावे. सध्याचे शैक्षणिक बदल सकारात्मकतेने स्वीकारावेत. प्राचार्य डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. अॅड. वैभव पेडणेकर, अॅड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे, प्रा. डॉ. नारायणन उपस्थित होते.

### देणगीदार कुलकर्णी व कुटुंबीयांचा सत्कार

अचल कुलकर्णी यांनी २५ लाखांची देणगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनला दिली. या देणगीतून पुष्पा देशपांडे-राशिवडेकर यांच्या नावे अत्याधुनिक सभागृह बांधले आहे. या देणगीबद्दल अचल कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला.

तरूण भारत

# विद्यापीठाने पेपर पुढे ढकलले

## १० ते १३ ऑगस्टपर्यंतच्या पेपरचे नवीन वेळापत्रक जाहीर होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. परंतु जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने १० ते १३ ऑगस्टपर्यंतचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. या पेपरचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती परिपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा सुरू आहेत. सध्या जिल्ह्यात पावसामुळे सुरूवातीला १० व ११ ऑगस्टचे पेपर पुढे ढकलले होते.

पान ९ पहा

# विद्यापीठाने पेपर पुढे ढकलले

पान १ वरुन

परंतु पावसाचा जोर कायम असून पूरपरिस्थितीत वाढ होत असल्याने शुक्रवार, १२ व शनिवार, १३ ऑगस्ट रोजी होणारे पेपरही पुढे ढकलले आहेत. महापुरामुळे विद्यार्थ्यांना येण्या-जाण्यासाठी अडचणी येत आहेत. इंटरनेट कनेक्टिव्हीटीचा अडथळा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी हे पेपर स्थगित करण्यात आले आहेत. नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे, याची नोंद महाविद्यालय, शिक्षणसंस्था, अधिविभाग, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# पूरपरिस्थितीमुळें विद्यापीठाची आज, उद्या परीक्षा होणार नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळें पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचे प्रमाण थोडे कमी झाले असले, तरी धरणांतून विसर्ग सुरू असल्याने पाणी पातळी कमी झालेली नाही. पूरपरिस्थिती कायम असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देणे शक्य नाही. ते लक्षात घेऊन आज, शुक्रवारी आणि उद्या, शनिवारी होणाऱ्या सर्व परीक्षा विद्यापीठाने स्थगित केल्या आहेत.

या पूरपरिस्थितीमुळे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्यास आणि जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. काही भागामध्ये विजेचा पुरवठा खंडित होत आहे.

इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा येत आहे. पावसाचे प्रमाण कमी झाले असले, तरी पाणीपातळी कमी झालेली नाही. त्यामुळे या अडचणी अद्याप दूर झालेल्या नाहीत. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने शुक्रवारी, शनिवारी होणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ : आज, उद्याच्याही परीक्षा स्थगित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या १२ व १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्ह्यातील पूर परिस्थितीमुळे १० व ११ ऑगस्ट रोजी होणाऱ्या परीक्षा यापूर्वीच स्थगित करण्यात आल्या आहेत. पूर परिस्थिती कायम असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्या-जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी १२ व १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात येत आहेत.

याबाबतची माहिती प्राचार्य, अधिविभाप्रमुख, सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी. स्थगित परीक्षेचे नवीन वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह यादव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या १२ आणि १३ ऑगस्टच्या परीक्षा रद्द

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील पूर परिस्थिती अद्यापही कायम असल्यामुळे दि. १२ व १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी गुरुवारी दिली. मार्च-एप्रिलमधील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध केंद्रांवर सुरू आहेत; परंतु विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थितीमुळे दि. १० व ११ रोजी होणाऱ्या परीक्षा रद्द केल्या होत्या; परंतु अद्यापही पूर परिस्थिती कायम असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर येण्या-जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. यासाठी दि. १२ व १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात येत आहेत.

12 AUG 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ मार्गावर होणार ८ कोटींचा भुयारी मार्ग

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या पाठपुराव्याला यश : सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हालचाली सुरू : निधी मिळताच कामाला होणार प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सुमारे १० हून अधिक विद्याशाखा मेन बिल्डींगच्या पुर्वेला रस्त्यापलीकडे विकसित होत आहेत. सुमारे १५ वर्षांपुर्वी विद्यापीठा समोरील रस्ता होताना पर्यायी उड्डाणपुलाची मागणी दुर्लक्षित झाली होती, पण अलीकडे वाढलेली रहदारी, विद्यार्थी, शिक्षकांना वाढलेला अपघाताचा धोका पाहून पर्यायी मार्गाची मागणी वाढत आहे. त्यातूनच विद्यापीठातून पुर्वेकडील विद्या शाखांकडे रहदारीसाठी भुयारी मार्गाची संकल्पना पुढे आली. प्रशासनाच्या प्रस्तावाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. ८ कोटींच्या या प्रस्तावाचे डिझाईनही तयार होत आहे.

शिवाजी विद्यापीठाचा गेल्या काही वर्षापासून पुर्वेकडे विस्तार वाढत आहे. विद्यापीठाच्या मेन बिल्डींगसमोरील रस्त्यापलीकडे मास कम्युनिकेशन, शिक्षणशास्त्र, इतिहास, डीओटी अशी दहा डिपार्टमेंट आहेत. तसेच शाहू संशोधन केंद्र, विद्यापीठ म्युझियम, महावीर संशोधन केंद्र आदींचा समावेश आहे. येथील शिक्षक, विद्यार्थ्यांना विद्यापीठात येण्या-जाण्यासाठी दुपदरी महामार्गाचा वापर करावा लागतो. या मार्गावर वाढलेली वाहतूक, भरधाव वाहनांमुळे वारंवार अपघात होत आहेत, परिणामी शिक्षक, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पर्यायी मार्गाची मागणी वाढत होती.

राजाराम कॉलेज परिसरातील आप्पासाहेब पवार चौकातून शाहू नाक्याकडे जाणाऱ्या मार्गावर गतिरोधक आहेत, या चौकात सध्या सिग्नलही उभारले आहेत. तरीही टेंबलाईवाडीकडून शाहू नाक्याकडे जाणारी वाहने भरधाव असतात. विद्यापीठाच्या




**शिवाजी विद्यापीठाच्या विविध विद्या शाखा मुख्य प्रवेशद्वारासमोरील बाजूस असणाऱ्या परिसरात वाढू लागल्या आहेत. अशावेळी मुख्य प्रवेशद्वारसमोर रस्ता ओलांडणे धोकादायक आहे. विद्यार्थी, शिक्षकांना अपघाताचा वाढलेला धोका लक्षात घेऊन पर्यायी मार्गाचा पाठपुरावा सुरू आहे.**

मेन गेटसमोरील चौकात कित्येकदा वाहन नियंत्रणाबाहेर गेल्याने अपघात घडले आहेत. रस्त्याचे चौपदरीकरण होत असताना उड्डाणपुलाची मागणी विद्यापीठाने केली होती, पण त्यावेळी याकडे दुर्लक्ष झाले होते, युतीच्या काळात चंद्रकांत पाटील पालकमंत्री असताना उड्डाणपुलाचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाने दिला होता, पण तो आर्थिकदृष्ट्या खर्चिक असल्याने मागे पडला होता.

दरम्यान, वर्षभरापुर्वी विद्यापीठाने भुयारी मार्गाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला होता. प्रत्यक्षात मार्चमध्ये हा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आला, यामध्ये विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्रासमोरील मोठ्या डी पासून रस्त्यापलीकडील शाहू संशोधन केंद्र आणि एज्युकेशन डिपार्टमेंट यांच्यामधील घळीपर्यंत भुयारी मार्ग आखला आहे. त्याचे डिझाईन पुण्यातील एका कन्सल्टन्सीने तयार केले आहे. भुयारी मार्गासाठी ८ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यासंदर्भातील अंदाजपत्रकही सार्वजनिक बांधकाम विभागाला सादर केल्याची माहिती विद्यापीठातून देण्यात आली. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागानेही या नियोजित भुयारी मार्गाच्या पुर्ततेसाठी कागदोपत्री हालचाली सुरू केल्या आहेत. विविध पातळ्यांवर मान्यता घेण्यात येत आहे. या अंडरपास अर्थात भुयारी मार्गामुळे मेन रोडसमोरील होणारी वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे.